(WC-103)

Excel Entry

(OK)

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड - अलिबाग
हिराकोट तळयाजवळ, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

❖ दुरध्वनी क्र : ०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२३२२ ❖ फॅक्स क्र : ०२१४१-२२७४५१ ❖
❖ ई-मेल : tahasildarmahasul@gmail.com ❖

क्रमांक:मशा/जमीन/अ-०३/कांदळवन/तक्रार/२०२३ दिनांक: /११/२०२३ 01/01/2024

प्रति,

मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक,
कांदळवन कक्ष,
३०२, वेक फिल्ड हाऊस, ३ रा मजला,
ब्रिटानिया रेस्टोरंट जवळ, बॅलार्ड ईस्टेट,
फोर्ट, मुंबई-४००००१.

**विषय:- श्री.बी.एन.कुमार, CIDCO Allots CRZ plot for rugby ground (तक्रार क्र. १०३)**

उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई
आवक क्रमांक 337
दिनांक 03/01/24
प्रशासकीय अधिकारी
उप वनसंरक्षक

संदर्भ:- १)आपलेकडील पत्र जा.क्र.ल.ले./कां.स./३१०२/सन २०२२-२३ दिनांक १०/०१/२०२३.
२) या कार्यालयाकडील पत्र क्र.मशा/जमीन/अ-०३/कांदळवन/तक्रार/२०२३ दिनांक ०६/०७/२०२३

Mangrove Comm.

उपरोक्त विषयान्वये अर्जदार श्री.बी.एन.कुमार, NAT CONNECT FOUNDATION यांचा दिनांक ०४/०१/२०२३ चा ईमेल तक्रार अर्ज संदर्भिय क्र.०१ कडील पत्रान्वये या कार्यालयास प्राप्त झाला आहे. अर्जदार यांच्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, पनवेल यांनी दिनांक ०३/०४/२०२३ रोजी सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने संदर्भिय क्र.०२ कडील पत्रान्वये आपले कार्यालयाकडे अहवाल सादर करण्यात आला आहे.

परंतु, मा.अध्यक्ष, कोकण कांदळवन/पाणथळ तक्रार निवारण समिती तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १२/०९/२०२३ रोजी झालेल्या कांदळवन तक्रार निवारण समितीच्या बैठकीमध्ये झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी महोदय यांनी प्रस्तुत तक्रारीमध्ये फेर चौकशी करुन अहवाल सादर करणेबाबत निर्देश दिले आहेत.

त्याअनुषंगाने तक्रारदार, संबंधित तहसिलदार, संबंधित प्राधिकरणाचे प्रतिनिधी (सिडको/महानगरपालिका/नगरपालिका/स्थानिक स्वराज्य संस्था), परिक्षेत्र वन अधिकारी यांचेसह संयुक्त स्थळपाहणी करुन, संयुक्त पंचनामा तसेच संबंधित जागेचे अक्षाशं व रेखाशं यासह Geo Tagged छायाचित्रासह स्वयंस्पष्ट अहवाल आवश्यक त्या कागदपत्रांसह सादर करणेबाबत उपविभागीय अधिकारी, पनवेल यांना या कार्यालयाकडील पत्र दिनांक १५/०९/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यांत आले आहे. त्यानुसार उपविभागीय अधिकारी, पनवेल यांनी त्यांचेकडील दि. ०३/१०/२०२३ रोजीच्या पत्रान्वये खालील नमुन्यात अहवाल सादर केलेला आहे.

**कांदळवन/पाणथळ तक्रारीचा पुर्तता अहवाल**

| अ.क्र. | तक्रारीचा तपशिल | कार्यवाहीचा तपशिल |
|---|---|---|
| १. | तक्रारदाराचे नांव व दिनांक | श्री.बी.एन.कुमार संचालक, NAT CONNECT FOUNDATION, दिनांक ०४/०१/२०२३ |
| २. | तक्रारीचा विषय | १० ACRE OF KHARGHAR WETLAND SYSTEMATICALLY BURIED |

| | | |
|---|---|---|
| ३. | तक्रारीशी संबंधित जागेचा तपशिल उदा.स.नं., गावाचे नांव, तालुका | मौजे खारघर, सेक्टर १६, ता.पनवेल जि.रायगड |
| ४. | चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नांव व पदनाम | १) उपविभागीय अधिकारी, पनवेल<br>२) तहसिलदार पनवेल<br>३) वन परिक्षेत्र अधिकारी, पनवेल<br>४) तक्रारदार |
| ५. | चौकशीमध्ये आढळुन आलेली वस्तुस्थिती. | सदर ठिकाणी मच्छिमारांनी मच्छिमारी करण्यासाठी पाण्यात मातीचे ढिगारे केल्याचे निदर्शनास आले. सदर ठिकाणी कांदळवनाचा अथवा पाणथळाचा ऱ्हास झाल्याचे निर्दशनास आलेले नाही. |
| ६. | कांदळवनाचा ऱ्हास झाला आहे किंवा नाही. | आजरोजी कांदळवन/पाणथळाचा ऱ्हास झाला असल्याचे दिसून आलेले नाही. |
| ७. | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास दाखल केलेला गुन्हा क्रमांक, दिनांक व संबंधित पोलीस स्थानकाचे नांव | अशी परिस्थिती उद्भवलेली नाही. |
| ८. | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास, ज्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे त्या व्यक्तींची नांवे व पत्ता | प्रश्न उद्भवत नाही. |
| ९. | कोणत्या कायद्याअंतर्गत/कलमा अंतर्गत गुन्हा दाखल केला त्याचे वर्णन. | प्रश्न उद्भवत नाही. |

उपविभागीय अधिकारी पनवेल यांचेकडील चौकशी अहवालाची त्यासोबतची कागदपत्रे माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे.

(डॉ. योगेश म्हसे)
जिल्हाधिकारी रायगड